ePaper

‖ वर्ष - 7 । अंक - 341 ‖ UDYAM-MH-26-0158827 ‖

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 11 जून 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## जागावाटप लवकर ठरवा, मित्रपक्षांशी हेवेदावे नको: राहुल गांधी



आतील पानांत

- गुन्ह्याच्या तपासात प्रगती!
- डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी १५ दिवस...
- निलेश लंके यांच्यावर कौतुकाचा वर्षाव!
- दक्षिण आफ्रिकेने उलटवली बाजी!

## शपथविधीनंतर अवघ्या 24 तासांत `NDA मध्ये खदखद

# भाजपने फसवणूक केली!

### मंत्रिपद न मिळाल्याने शिवसेनेचे बारणे अन् राष्ट्रवादीच्या बनसोडेंची नाराजी!

। पिंपरी-चिंचवड ।महाईन्यूज

**लोकसभेच्या निवडणुकीत शिवसेनेने भाजपबरोबर महायुतीच्या माध्यमातून निवडणूक लढविली. महाराष्ट्रात भाजपचे नऊ खासदार निवडून आले तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचे सात खासदार विजयी झाले. मात्र असे असतानाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळात शिवसेनेच्या शिंदे गटाची केवळ एकाच केंद्रीय राज्यमंत्रिपदावर बोळवण करण्यात आल्याने शिंदे यांच्या खासदारांमध्ये नाराजी पसरली आहे. मंत्रीपदे देताना दुजाभाव करण्यात आल्याचा आरोप मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी केला आहे.**





### उद्योगनगरीत नाराजी !

विधानसभा निवडणूका डोळ्यासमोर असताना भाजपने शिवसेना शिंदे गटाला एक केंद्रीय मंत्रिपद आणि एक राज्य मंत्रिपद देणे गरजेचेच होते. मात्र हे झाले नाही. मोदी सरकारमध्ये भाजपचे 61 मंत्री आहेत. तर घटक पक्षांचे 11 मंत्री आहेत. ही न्यायिक भूमिका महाराष्ट्राला द्यायला हवी होती. विस्तारापूर्वीच याचा विचार करायला पाहिजे होता. भाजपने जो दुजाभाव केला आहे. त्याबाबत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पक्षाच्या सर्व खासदारांनी आपली नाराजी बोलून दाखविली आहे.

खासदार बारणे यांनी प्रसारमाध्यमांसमोरच आपल्या मनातील सल बोलून दाखविल्याने महायुतीमधील घटक पक्षातील खदखद चव्हाट्यावर आली आहे. महायुतीत सहभागी असलेल्या भारतीय जनता पक्षाने मंत्रीपदे देताना शिवसेनेबरोबर दुजाभाव केला असल्याचा आरोप बारणे यांनी केला. बारणे म्हणाले, आमच्या शिवसेनेचा स्ट्राईक रेट पाहता,आम्हाला कॅबिनेट मंत्री पद द्यायला हवं होतं. पण एक राज्यमंत्रीपद आम्हाला देण्यात आले. एनडीए मधील इतर घटक पक्षांचे केवळ एक-एक खासदार निवडून आलेत, मात्र त्यांना भाजपने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्रीमंडळात कॅबिनेट मंत्रिपदे दिली. मग फक्त शिंदे गटाबाबत भाजपने हा दुजाभाव का केला? असा प्रश्न श्रीरंग बारणे यांनी विचारला आहे. शिवसेना शिंदे गटाने भाजपबरोबर महाराष्ट्रात एकत्रितपणे निवडणूक लढविली होती. यामध्ये सात जागांवर शिवसेनाला विजय मिळाला. तर भाजपचे नऊ खासदार निवडून आले. त्यामुळे भाजपने आम्हाला न्याय देण्याची भूमिका ठेवली पाहिजे होती. तीन महिन्यांमध्ये विधानसभेच्या निवडणूका येत आहेत. या निवडणुकीला सामोरे जाताना भाजपने शिवसेनेला न्याय देणे गरजेचे होते, असेही बारणे म्हणाले. राज्यात सत्तापरिवर्तन होत असताना राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्या पक्षाने ठोस भूमिका घेतली होती.कुटूंबाच्या विरोधात जाऊन अजित पवार महायुतीत सहभागी झाले. निवडणुकीत आपल्याच घरातील व्यक्तींशी त्यांनी संघर्ष केला. त्यामुळे पंतप्रधान मोदी यांच्या मंत्रिमंडळात अजित पवारांना देखील एक केंद्रीय मंत्रिपद भाजपने द्यायला हवे होते. तसेच साताऱ्याचे खासदार उदयनराजे भोसलेंना यांना देखील मंत्रिपद द्यायला हवे होते, असे म्हणत खासदार बारणेंनी

> एकही मंत्रिपद न मिळाल्याने आपण नाहीतर राज्यातील पक्षाचे सर्वच कार्यकर्ते नाराज झाले आहेत. खरंतर संसदरत्नासह महासंसदरत्नाचे मानकरी आणि खासदारकीची हॅटट्रिक केलेले बारणे हे यावेळी केंद्रात मंत्रिपदासाठी मोठे दावेदार होते. सात खासदार असलेल्या त्यांच्या शिवसेना पक्षाने एक कॅबिनेट आणि एक राज्यमंत्री पद देण्याची मागणी केली होती. पण, त्यांना केवळ एक राज्यमंत्री पद आणि ते बुलढाण्याचे खासदार प्रताप जाधव यांना दिले गेले. त्यामुळे मंत्रिपदापासून पिंपरी-चिंचवड पुन्हा वंचित राहिले. शहरवासियांमध्ये नाराजी पसरली. तशीच ती एकही मंत्रीपद न मिळालेल्या राष्ट्रवादीतही पसरली. **-अण्णा बनसोडे,** आमदार, पिंपरी विधानसभा

आपल्या मनातील सगळी खदखद प्रसारमाध्यमांसमोरच बोलून दाखवली. केंद्रीय मंत्रिमंडळाचा शपथविधी रविवारी झाला. मात्र, त्यानंतर २४ तासांतच सोमवारी (ता.१०) `एनडीए`तील खदखद समोर आली. मंत्रिपद देताना शिवसेनेला एक न्याय, तर दुसऱ्या पक्षाला एक असं झाल्याचं शिवसेनेचे मावळचे खासदार श्रीरंग बाऱणे म्हणाले.भाजपचा तथा `एनडीए`तील जुना मित्र म्हणून एका कॅबिनेट आणि एका राज्यमंत्री पदाची अपेक्षा होती, असे बारणे म्हणाले. पण, फक्त एकच राज्यमंत्रिपद दिले. याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. कॅबिनेट मंत्रिपद मिळाले असते, तर समाधान वाटले असते,असे ते म्हणाले.

एनडीएतील चिराग पासवानांपेक्षा (५) शिवसेनेचे (७) खासदार जास्त निवडून येऊनही चिराग यांना कॅबिनेट मंत्रीपद दिले आणि शिवसेनेला मात्र नाही,याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. अगदी एकच खासदार असलेले जितीन माझी यांनाही ते देण्यात आले, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

### 'संसदरत्न' बारणे मंत्रिपदापासून वंचितच

आपली नाराजी नाही, तर पक्षाला एका कॅबिनेटसह दोन मंत्रीपदे मिळावीत ही अपेक्षा आपले नेते तथा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कानावर घातली असून ते ही भावना भाजप वरिष्ठांच्या कानावर घालतील,असे बारणे म्हणाले. भाजपने राज्यात 28 जागा लढवून नऊ जिंकल्या.तर, शिवसेनेने 15 लढवून 9 जागांवर विजय प्राप्त केला. आमचा विजयाचा स्ट्राईक रेट हा भाजपपेक्षा चांगला असल्याने कॅबिनेट मंत्रिपद मिळेल,असे वाटले होते,ते म्हणाले आणि म्हणून शिवसेनेबाबत न्याय भूमिका घेण्याची मागणी त्यांनी केली. अजित पवारांनी भाजपसाठी खूप महत्वाची भूमिका या लोकसभा निवडणुकीत पार पाडली असल्याने त्यांनाही न्याय दिला पाहिजे होता,असे बारणे म्हणाले.तीनदा निवडून आलेले साताऱ्याचे भाजपचे खासदार आणि छत्रपती शिवरायांचे वंशज उदयनराजे भोसले यांच्याबाबतीत सन्मानाची भूमिका घ्यावी,अशी महाराष्ट्राची भावना होती,असे भाष्य त्यांनाही न मिळालेल्या मंत्रिपदावर बारणेंनी केले. त्याचवेळी कुणाला मंत्री करायचे आणि कुणाला नाही, हा भाजपचा अंतर्गत विषय असल्याचे सांगण्यासही ते विसरले नाहीत.

# गुन्ह्याच्या तपासात प्रगती!

## अगरवाल दाम्पत्यासह तिघांच्या पोलीस कोठडीत वाढ

।पुणे। महाईन्यूज। प्रतिनिधी।

**कल्याणीनगर अपघात प्रकरणात मोटारचालक अल्पवयीन मुलाचे रक्ताचे नमुने नष्ट करण्यात आले आहे. या प्रकरणात न्यायालयाने अगरवाल दाम्पत्यासह अश्फाक मकानदारच्या पोलीस कोठडीत चार दिवस वाढ करण्याचे आदेश सोमवारी दिले.**



अटक करण्यात आलेला आरोपी मकानदारने मुलाचे बांधकाम व्यावसायिक वडील विशाल अगरवाल यांना कोणाच्या सांगण्यावरून मदत केली आहे, याचा शोध घ्यायचा असल्याने विशाल अगरवाल, त्याची पत्नी शिवानी आणि अश्फाक यांच्या पोलीस कोठडीत वाढ करण्याची विनंती सरकार पक्षाने न्यायालयात केली.अगरवाल दाम्पत्यासह अश्फाकच्या पोलीस कोठडीची मुदत सोमवारी संपली. तिघांना न्यायाधीश यू. एम. मुधोळकर यांच्या न्यायालयात हजर करण्यात आले. ससूनमधील शिपाई अतुल घटकांबळे याच्यामार्फत अश्फाकने डॉ. अजय तावरे, डॉ. श्रीहरी हाळनोर यांना पैसे पोहोचविले. अश्फाकने कोणाच्या सांगण्यावरून पैसे पोहोचविले, या दृष्टीने तपास करायचा असल्याची माहिती गुन्हे शाखेचे सहायक पोलीस आयुक्त सतीश गोवेकर यांनी न्यायालयात दिली. अश्फाक गुन्हा दाखल झाल्यानंतर पसार झाला होता. त्याला कोणी मदत केली, तसेच आरोपी डॉ. अजय तावरेंच्या संपर्कात तो कसा आला, या दृष्टीने सखोल तपास करायचा असल्याने आरोपींच्या पोलीस कोठडीत वाढ करण्याची विनंती गोवेकर यांनी न्यायालयाकडे केली.या गुन्ह्याच्या तपासात प्रगती झाली आहे. आरोपी घटकांबळेने वापरलेली दुचाकी जप्त करण्यात आली आहे. बाल न्याय मंडळाच्या आवरात घटकांबळेने अगरवाल यांच्याकडून रोकड घेतली होती. डॉ. श्रीहरी हाळनोर याच्या हस्ताक्षराचा नमुना जप्त करण्यात आला आहे. ससून रुग्णालयाच्या वॉर्ड क्रमांक ४० मधील नोंदणी पुस्तिका (रजिस्टर) जप्त करण्यात आली आहे. विशाल अगरवाल, अश्फाक मकानदार, डॉ. अजय तावरे, डॉ. श्रीहरी हाळनोर संपर्कात आल्याचे निष्पन्न झाले आहे.मकानदारने मुलाचे बांधकाम व्यावसायिक वडील विशाल अगरवाल यांना कोणाच्या सांगण्यावरून मदत केली आहे, घ्यायचा असल्याने विशाल अगरवाल, त्याची पत्नी शिवानी आणि अश्फाक यांच्या पोलीस कोठडीत वाढ करण्याची विनंती सरकार पक्षाने न्यायालयात केली.

### अश्फाकच्या कोठडीची मुदत संपली

अगरवाल दाम्पत्यासह अश्फाकच्या पोलीस कोठडीची मुदत सोमवारी संपली. तिघांना न्यायाधीश यू. एम. मुधोळकर यांच्या न्यायालयात हजर करण्यात आले. ससूनमधील शिपाई अतुल घटकांबळे याच्यामार्फत अश्फाकने डॉ. अजय तावरे, डॉ. श्रीहरी हाळनोर यांना पैसे पोहोचविले. अश्फाकने कोणाच्या सांगण्यावरून पैसे पोहोचविले, या दृष्टीने तपास करायचा असल्याची माहिती गुन्हे शाखेचे सहायक पोलीस आयुक्त सतीश गोवेकर यांनी न्यायालयात दिली.


अश्फाक गुन्हा दाखल झाल्यानंतर पसार झाला होता. त्याला कोणी मदत केली, तसेच आरोपी डॉ. अजय तावरेंच्या संपर्कात तो कसा आला, या दृष्टीने सखोल तपास करायचा असल्याने आरोपींच्या पोलीस कोठडीत वाढ करण्याची विनंती गोवेकर यांनी न्यायालयाकडे केली.या गुन्ह्याच्या तपासात प्रगती झाली आहे. आरोपी घटकांबळेने वापरलेली दुचाकी जप्त करण्यात आली आहे. बाल न्याय मंडळाच्या आवरात घटकांबळेने अगरवाल यांच्याकडून रोकड घेतली होती. डॉ. श्रीहरी हाळनोर याच्या हस्ताक्षराचा नमुना जप्त करण्यात आला आहे. ससून रुग्णालयाच्या वॉर्ड क्रमांक ४० मधील नोंदणी पुस्तिका (रजिस्टर) जप्त करण्यात आली आहे.

# शिक्षक भरती : ११ हजार ८५ उमेदवारांची निवड

## शाळेतील शिक्षक पदभरतीबाबतची प्रक्रिया राबवण्यास मान्यता

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पवित्र संकेतस्थळातर्फे राबवण्यात येत असलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेत स्थानिक स्वराज्य संस्थाअंतर्गत शाळेतील शिक्षक पदभरतीबाबतची प्रक्रिया राबवण्यास मान्यता मिळाली आहे. त्यामुळे २५ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध केलेल्या गुणवत्ता यादीतील उर्वरित उमेदवारांच्या नियुक्तीबाबतची कार्यवाही संबंधित व्यवस्थापनांना पूर्ण करता येणार आहे. शिक्षक भरती प्रक्रियेत**



भरती प्रक्रियेतील निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती प्रक्रिया रखडली होती. मात्र आयोगाने लोकसभा निवडणुकीचे मतदान झालेल्या जिल्ह्यांत शिक्षकांची नियुक्ती प्रक्रिया करण्यास परवानगी दिली. लोकसभा निवडणुकीपाठोपाठ विधान परिषदेतील पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या निवडणूक जाहीर झाल्याने या निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे नियुक्ती प्रक्रिया आणखी पुढे ढकलली जाण्याची शक्यता निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर शिक्षक भरती प्रक्रियेला मान्यता मिळाल्याने उमेदवारांना दिलासा मिळाला आहे.शिक्षण विभागाने दिलेल्या प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिलेल्या माहितीनुसार, पदवीधर शिक्षक मतदार संघाच्या प्रक्रियेवर प्रभाव पडून आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होईल अशी कोणतीही कृती घडणार नाही, याबाबत खबरदारी घेऊन स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत शाळेतील शिक्षक पदभरती बाबतची प्रक्रिया राबवण्यास मान्यता मिळाली आहे. २५ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध केलेल्या गुणवत्ता यादीतील उर्वरित उमेदवारांच्या नियुक्ती बाबतची कार्यवाही संबंधित व्यवस्थापनांना पूर्ण करता येईल. समांतर आरक्षणातील पदे भरण्याची कार्यवाही करण्याच्या दृष्टीने प्रचलित शासन निर्णयांप्रमाणे संबंधित विभागांचे अभिप्राय प्राप्त करून पदभरतीची कार्यवाही करण्याबाबत शासनाने परवानगी दिली आहे. त्यानुसार माजी सैनिक या समांतर आरक्षणातील पदे रूपांतरित करण्यास ना हरकत प्राप्त करण्यासाठी आयुक्तालयातील उपसंचालक यांनी संबंधित कार्यालयास समक्ष भेट देऊन प्रस्ताव सादर केला आहे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून जलद गतीने मान्यता देण्यासाठी विनंती करण्यात आली आहे. समांतर आरक्षणाबाबतची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थाअंतर्गत शाळेतील शिक्षक पदभरतीची व्यवस्थापननिहाय सर्वसाधारण गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

### नियुक्ती प्रक्रिया आणखी पुढे ढकलली

मात्र आयोगाने लोकसभा निवडणुकीचे मतदान झालेल्या जिल्ह्यांत शिक्षकांची नियुक्ती प्रक्रिया करण्यास परवानगी दिली. लोकसभा निवडणुकीपाठोपाठ विधान परिषदेतील पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणूक जाहीर झाल्याने या निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे नियुक्ती प्रक्रिया आणखी पुढे ढकलली जाण्याची शक्यता निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर शिक्षक भरती प्रक्रियेला मान्यता मिळाल्याने उमेदवारांना दिलासा मिळाला आहे.शिक्षण विभागाने दिलेल्या प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिलेल्या माहितीनुसार, पदवीधर शिक्षक मतदार संघाच्या प्रक्रियेवर प्रभाव पडून आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होईल अशी कोणतीही कृती घडणार नाही.

# महापालिका बालवाडी शिक्षिकांना 'मान्सून गिफ्ट'!

## मानधनामध्ये एकूण 10 टक्के वाढ; 204 कर्मचाऱ्यांना फायदा

### महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची स्थायी समितीमध्ये मान्यता

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिका प्राथमिक शिक्षण विभागात काम करणाऱ्या २०४ बालवाडी शिक्षक व सेविका यांना महापालिका प्रशासनाकडून 'मान्सून गिफ्ट' मिळाले आहे. संबंधित कर्मचाऱ्यांना मानधनामध्ये १० टक्के वाढ देण्याच्या प्रस्तावास स्थायी समितीमध्ये मंजुरी देण्यात आली.**





> बालवाडीमध्ये शिकणाऱ्या सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना ज्ञानदान करण्याचे कर्तव्य बालवाडी शिक्षिका व सेविका करीत आहेत. दोन वर्षांच्या सेवेनंतर १० टक्के मानधनामध्ये वाढ करावी, असा निर्णय झाला आहे. पण, २०२३ पासून या निर्णयाची अंमलबजावणी तांत्रिक बाबींमुळे झाली नाही. याबाबत प्राशासना सूचना केली होती. त्यामुळे २०४ बालवाडी कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे.
> **- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

महापालिका शिक्षण विभागाच्या माध्यमातून प्राथमिक शिक्षण विभागात सध्या २०४ बालवाडी कार्यरत आहेत. या बालवाड्यांमध्ये १९२ शिक्षिका, १ मुख्य समन्वयक, ८ समन्वयक आणि ३ बालवाडी सेविका असे २०४ कर्मचारी मानधन तत्वावर काम करीत आहेत.

संबंधित कर्मचाऱ्यांची मानधनामध्ये दर दोन वर्षांनी एकवटउ मानधनाचे १० टक्के वाढ करण्याबाबत २०२१ मध्ये मान्यता देण्यात आली आहे. सप्टेंबर २०२३ मध्ये सदर कर्मचाऱ्यांच्या सेवेची दोन वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे ऑक्टोबर २०२३ पासून संबंधितांना मानधनामध्ये वाढ करणे अपेक्षीत होते.

याबाबत भाजपा आमदार महेश लांडगे यांनी प्रशासनाकडे पाठपुरावा केला. त्याला यश मिळाले असून, महापालिका स्थायी समितीमध्ये संबंधित प्रस्तावाला आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी मंजुरी दिली आहे.

---

# ७२ सदनिकाधारकांची फसवणूक!

## पोर्शे अपघात प्रकरणातील विशाल अग्रवालवर हिंजवडीत गुन्हा दाखल

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुण्यातील कल्याणीनगर येथे झालेल्या पोर्शे कार अपघात प्रकरणातील विशाल अग्रवाल आणि त्याच्या साथीदारांवर हिंजवडीपोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला. अग्रवाल आणि त्याच्या साथीदारांनी एका बांधकाम प्रकल्पामध्ये ७२ सदनिकाधारकांना ठरवून दिलेल्या सोयी सुविधा दिल्या नाहीत. बावधन येथील नॅन्सी को ऑप हौसिंग सोसायटीत १ जानेवरी २००७ ते ९ जून २०२४ या कालवधीत फसवणुकीचा हा प्रकार घडला.**



### विशाल अग्रवालवर विविध गुन्हे

पुणे पोलिसांकडून विशाल अग्रवालवर आता पर्यंत कलम २०१ अंतर्गत पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचाही गुन्हा दाखल असून या प्रकरणी विशाल अगरवाल हा त्याच्या पत्नीसह पोलिस कोठडीत आहे. त्याने अल्पवयीन मुलासोबत कारमध्ये असलेल्या ड्रायव्हरला 'तू कार चालवत होता असं पोलिसांना खोटं सांग' असा दबाव टाकला असल्याचे पोलिस तपासात पुढे आले आहे. तर मुलाचे रक्ताचे नमुने देखील बदलण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी गुन्हा दाखल आहे. या सोबतच आरटीओच्या तक्रारीचेही गुन्हे दाखल करण्यात आले आहे. त्यानंतर आज कलम ४२० अंतर्गत आणखी एक गुन्हा विशाल अग्रवालवर दाखल झाला आहे.

नॅन्सी ब्रह्मा असोसिएटस या प्रकल्पाचे विकसक विशाल सुरेंद्रकुमार अग्रवाल, राम कुमार अग्रवाल, विनोद कुमार अग्रवाल, नंदलाल किमतानी, आशिष किमतानी आणि इतर संशयितांच्या विरोधात फसवणुकीसह महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅट ॲक्ट नुसार गुन्हा दाखल केला. विशाल अरुण अडसूळ (४२, रा. नॅन्सी ब्रह्मा रेसिडेन्सी को ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, बावधन, पुणे) यांनी याप्रकरणी रविवारी (दि. ९) हिंजवडीपोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बावधन येथील नॅन्सी ब्रह्मा रेसिडेन्सी को ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीमध्ये फिर्यादी विशाल अडसूळ आणि इतर ७१ जणांनी संशयितांकडून सदनिका खरेदी केल्या. सदनिका आणि इतर सोयीसुविधा देण्यासाठी ठरलेली रक्कम सर्व सदनिकाधारकांनी विकासकांना दिली. सोसायटीतील ७२ जणांना झालेल्या व्यवहारात विकासकांनी नॅन्सी ब्रह्मा को ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, बावधन खुर्द या सोसायटीच्या मालकीच्या असणाऱ्या पार्किंग आणि ॲमिनीटीजची जागा व मोकळी जागा सोसायटीला देणे बंधनकारक होते. असे असताना त्यांनी त्या प्रकल्पात एकूण तीन सोसायट्या तयार केल्या.

प्रत्येक सोसायटीला एकाच ठिकाणची ॲमिनीटीची आणि मोकळी जागा नकाशामध्ये दाखवली. नकाशामध्ये इतर लोकांच्या मदतीने वेळोवेळी फेरबदल करून नकाशे मंजूर करून घेतले.

सोसायटीच्या सभासदांची कोणतीही परवानगी न घेता विकासकांनी सोसायटीच्या जागेवर विंटेज टॉवर आणि विंटेज हाय या नावाने दोन इमारती बांधल्या. विंटेज टॉवर ११ मजली इमारत असून त्यात ६६ व्यावसायिक कार्यालये तर विंटेज हाय या १० मजली इमारतीमध्ये २७ सदनिका आणि १८ दुकाने बांधून नॅन्सी ब्रम्हा को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड या सोसायटीतील ७२ सदनिका धारकांचा विश्वासघात करून फसवणूक केली, असे फिर्यादीत नमूद आहे. सहायक पोलिस निरीक्षक सोमनाथ पांचाळ तपास करीत आहेत.

# यंदा यूट्यूब वाहिन्या जिंकल्या



भूमिका

**२०२४च्या लोकसभा निवडणुकीच्या अनेक वैशिष्ट्यांपैकी एक वैशिष्ट्य म्हणजे यूट्यूबर्सनी उमटवलेला ठसा. अपवाद वगळता इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर पत्रकारिताधर्म विसरल्याचा आरोप होत असताना, निवडणुकीसंबंधी चर्चा किंवा संपादकीय ऐकण्यासाठी जनतेने मोठ्या प्रमाणात यूट्यूब वाहिन्यांना प्राधान्य दिले.**

त्यामध्ये रविशकुमार यांच्यासारख्या नावाजलेल्या, अतिशय लोकप्रिय आणि विश्वसनीय पत्रकाराच्या वाहिनीपासून 'सत्य हिंदी'सारख्या काही पत्रकारांनी एकत्र येऊन सुरू केलेल्या उपक्रमापर्यंत अनेक व्यासपीठांचा समावेश आहे.पुण्यप्रसून वाजपेयी, अजित अंजुम हे स्वतंत्र पत्रकार; सत्य हिंदी, ४ पीएम, न्यूजलाँड्री, द वायर, द रेड माईक, द पब्लिक इंडिया यासारख्या वाहिन्यांनी मोठ्या प्रमाणात प्रेक्षकांना आकर्षित केले.



त्याशिवाय डीकोडरच्या माध्यमातून पुन्हा एकदा प्रेक्षकांसमोर आलेले ज्येष्ठ पत्रकार डॉ. प्रणॉय रॉय यांना ऐकणे हाही अनेक प्रेक्षकांसाठी समाधानकारक अनुभव होता. या पत्रकारांच्या एकेका कार्यक्रमाला मिळणारे लाखो व्ह्यूज एकाच वेळी त्यांची विश्वसनीयता आणि मुख्य माध्यमांची ढासळणारी विश्वासर्हता अधोरेखित करतात. त्याशिवाय मराठीमध्ये प्रशांत कदम यांची स्वतंत्र वाहिनी, द इंडी जर्नल, थिंक बँक यांचीही कामगिरी उल्लेखनीय ठरली. या वाहिन्यांवर चर्चात्मक कार्यक्रमांना चांगला परिणाम मिळाला. प्रत्यक्ष दौरे करून माहिती मिळवणाऱ्या पत्रकारांशी चर्चा, स्थानिक व अनुभवी पत्रकारांच्या मुलाखती किंवा थेट लोकांमध्ये जाऊन सर्वसामान्यांची मते जाणून घेणे असे साधारण या कार्यक्रमांचे स्वरूप होते. रविशकुमार, वाजपेयी, आनंदवर्धन सिंह यांनी ठाम पण संयत शैलीत विविध घटनांचे अनेक पैलू समोर आणले. तर 'द वायर'च्या आफसा खानम शेरवानी, न्यूजक्लिकचे अभिसार शर्मा यांनी आक्रमकपणे महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले. विशेषतः शेरवानी यांनी मुस्लीम समाजाचे प्रश्न ज्या तळमळीने मांडले ते महत्त्वाचे मानले पाहिजे. व्यवसायाने पत्रकार नसलेल्या-तरीही प्रभावी ठरलेल्या अशा एका यूट्यूबरचा उल्लेख आतापर्यंत केलेला नाही, तो अर्थातच ध्रुव राठी! अनेक वर्षांपासून विविध विषयांवर कार्यक्रम करणाऱ्या राठीने गेल्या काही महिन्यांपासून भारताच्या राजकारणावर लक्ष केंद्रित केले. एकेका कार्यक्रमाला कोट्यवधी प्रेक्षक मिळवणाऱ्या मोजक्या यूट्यूबरमध्ये त्याचा समावेश होतो. त्याचे तब्बल २.२० कोटींपेक्षा जास्त सबस्क्रायबर्स आहेत. त्याने मुख्यतः सत्ताधारी पक्षाला अडचणीत टाकणारे अनेक कार्यक्रम केले. निवडणूक रोखे घोटाळा, देशाची हुकूमशाहीकडे होऊ घातलेली वाटचाल, व्हॉट्सॲपसारख्या समाजमाध्यमांवरून पसरवल्या जाणाऱ्या अफवा, मोदींची प्रतिमानिर्मिती असे अनेक मुद्दे तो उपस्थित करत राहिला. याच यादीत आकाश बॅनर्जीची वाहिनी, लल्लनटॉप यांचाही समावेश करता येईल. ध्रुव राठी असो किंवा वर उल्लेख केलेले यूट्यूब पत्रकार, या सर्वांनी प्रेक्षकांची जितकी वाहवा मिळवली तितकाच समाजमाध्यमांवर जल्पकांचा-'ट्रोल'चा त्रासही सहन केला. वैयक्तिक शेरेबाजीपासून थेट हल्ल्यांच्या धमक्यांपर्यंत त्यांचा सर्व प्रकारचा ऑनलाईन छळ करण्यात आला. मात्र त्याला पुरून उरत हे पत्रकार आपले काम करत राहिले. थोडे बारकाईने पाहिले तर एखाद दुसरा अपवाद वगळता, यापैकी बहुसंख्य पत्रकार गेल्या चार-पाच वर्षांमध्ये मुख्य माध्यमांमधून बाहेर पडलेले किंवा त्यांना बाहेर पडण्यास भाग पाडण्यात आले, असे आहेत. त्यांना यूट्यूबवर मिळालेले यश हे दुसरीकडे सध्याच्या मुख्य माध्यमांची मर्यादा दाखवून देणारेही आहे.मुख्य इलेक्ट्रॉनिक माध्यमांची, विशेषतः राष्ट्रीय, काय अवस्था आहे ते वेगळे सांगायला नको. पूर्णपणे सरकारधार्जिणी पत्रकारिता (?) करण्याच्या धोरणामुळे भल्याभल्या पत्रकारांची तारांबळ उडताना प्रेक्षकांनी पाहिली. सरकारला अडचणीत आणणारे प्रश्न टाळायचे, पंतप्रधान जेव्हा कधी मुलाखत देतील तेव्हा त्यांना केवळ प्रतिमानिर्मिती करणारे प्रश्न विचारायचे, त्यांच्या उत्तराला प्रतिप्रश्न करायचे नाहीत या अलिखित/ अघोषित धोरणामुळे त्यांची मुलाखत घेणाऱ्या पत्रकारांची कुचंबणाही झाल्याचे पाहायला मिळाले. निवडणूक प्रचार सुरू असताना एका वृत्तवाहिनीला मुलाखत देताना नरेंद्र मोदींनी एक वक्तव्य केले. ते म्हणाले की, जोपर्यंत गांधींवरचा सिनेमा आला नव्हता तोपर्यंत बाहेरच्या जगाला गांधीजी कोण हे माहीतच नव्हते.

## प्रासंगिक »

# धर्मनिरपेक्षतेची अट

***राज्यसंस्थेने धर्माच्या क्षेत्रापासून अंतर राखले पाहिजे आणि एकाच धर्माचा प्रचार करता कामा नये, असा धर्मनिरपेक्षतेचा अन्वयार्थ आहे...***

पूर्वी हज यात्रेकरिता सरकारमार्फत अनुदान दिले जात असे. यासाठी 'हज समिती कायदा' केला गेला होता. या कायद्याला आव्हान दिले गेले. २०११ साली सर्वोच्च न्यायालय म्हणाले की सार्वजनिक निधीमधील छोटी रक्कम याकरिता दिली जात असेल तर त्यातून धर्मनिरपेक्षतेच्या मूल्यांचे उल्लंघन होत नाही. धार्मिक सहिष्णुतेकरिता सरकारने अशी मदत करणे गैर नाही, असे या निकालपत्रात म्हटले होते. विशेषत: अनुच्छेद २७ मध्ये कोणत्याही धर्मास प्रोत्साहन न देण्याचे तत्त्व महत्त्वाचे मानले आहे. धर्म प्रसाराकरिता कर संकलित केला जात नाही; मात्र काही सुविधांसाठी सरकार शुल्क आकारू शकते. धार्मिक उत्सवांसाठी किंवा तीर्थयात्रांसाठी अनुदान देणे हा तर नेहमीच वादग्रस्त राहिलेला मुद्दा आहे. २०१२ साली मात्र सर्वोच्च न्यायालयाने हज यात्रेकरिताचे अनुदान टप्प्याटप्प्याने कमी करत १० वर्षात बंद करावे, असे सांगितले. त्यानुसार २०२२ मध्ये हज यात्रेचे अनुदान रद्द झाले.

जमलेल्या तमाम मराठवाडाकरांनो, राजकारणात करिअर करू इच्छिणाऱ्या तरुणांनो, दानवे पराभूत झाले तर डोक्यावरची टोपी काढेन अशी प्रतिज्ञा समारंभपूर्वक पूर्ण करण्यासाठी सर्वांचे लाडके नेते अब्दुल सत्तार आज काहीही न बोलण्याच्या अटीवर हजर झाले आहेत. नुकतेच त्यांनी शिवसेनेसोबतच्या प्रासंगिक करारावर चपखल भाष्य केले.

# सत्तार पटकन राजकीय रंग बदलतात

निवडणुकांना अजून वेळ असल्याने त्यावर अधिक बोलणे नको म्हणून त्यांची अट आम्ही मान्य केली व ते या 'टोपीकाढ' कार्यक्रमाला आले. यानिमित्ताने त्यांच्या 'कार्य'कर्तृत्वाचा आढावा मी घेणार आहे.राजकीय हवामानाचे अचूक अंदाज बांधण्यात माहीर असलेल्या या नेत्याची तत्परता काय वर्णावी! लोकांचा कल आपल्या बाजूने झुकवण्यापेक्षा ते त्यांना स्वतंत्रपणे विचार करू देतात. एकदा त्यांचा कल निश्चित झाला की त्या पद्धतीने राजकारणात पावले टाकतात. मतदारांना एवढे स्वातंत्र्य देणारा नेता राज्यात नाही. (टाळ्या) मतपेढी कुणाकडे झुकली हे बघून कोणत्या पक्षात जायचे हे ठरवायला फारच मोठी हिंमत लागते. ती सत्तारांकडे आहे. त्यामुळे ते खऱ्या अर्थाने मराठवाडाभूषण ठरतात. त्यांनी केलेली प्रासंगिक करार ही कोटी उच्च दर्जाची म्हणावी अशीच. तात्पुरता करार अडीच ते पाच वर्षे राहू शकतो हे जनतेच्या पहिल्यांदाच लक्षात



आले. एसटी महामंडळाने त्यांच्या या बुद्धिमत्तेचा फायदा करून घेतला तर हे मंडळसुद्धा नफ्यात येईल.अनेकांना वाटते की सत्तार पटकन राजकीय रंग बदलतात. हे साफ खोटे अशी ग्वाही मी या ठिकाणी देतो. सत्तेच्या माध्यमातून सामान्यांचा (स्वत:चा नाही) विकास हेच त्यांचे ध्येय या बदलामागे आहे. आधी ते अशोक चव्हाणांसोबत काँग्रेसमध्ये होते. दिसताच त्यांनी देवेंद्रभाऊंच्या जनादेश यात्रारथात बसण्याचा प्रयत्न केला. तो अपयशी ठरल्यावर ते तडक मातोश्रीवर गेले. तिथे घुसमट जाणवताच ते शिंदेंच्या खऱ्या सेनेत दाखल झाले. आता सिल्लोडमधली ४५ हजारांची मतपेढी आघाडीकडे झुकल्याचे दिसताच त्यांनी खासदार कल्याण काळेंना जवळ केले. या प्रवासाकडे पक्षबदल म्हणून पाहू नका. सामान्य जनतेच्या मतांचा एवढा विचार करणारा नेता या प्रदेशाला लाभला हे आपले भाग्यच. लोकांच्या हितासाठी भूमिका बदलताना त्यांना अनेकदा त्रास झेलावा लागला. पासवाननंतर तुम्हीच अशी शेरेबाजी ऐकावी लागली. पण कधीही त्यांनी ही अवहेलना चेहऱ्यावर दिसू दिली नाही. जनकल्याण जलदगतीने व्हावे म्हणून त्यांनी कृषी खाते निवडले. आजही त्यांचा जीव शेतीच्या बांधावर रमतो. दौऱ्यावर असताना ते मोक्याच्या जमिनी बघत त्या लागवडीखाली (मालकी नाही) कशा आणता येतील याचाच विचार करत असतात. जनउत्थानाचे कार्य करताना कधी हुल्लडबाजी झालीच तर ते चिडतात, गावरान भाषेत लोकांना शांत करण्याचा प्रयत्न करतात पण त्यांच्या मनात काही नसते. कर्तृत्वाने राज्याचे लक्ष वेधणाऱ्या या नेत्यास मी आता प्रतिज्ञा पूर्ण करण्याची विनंती करतो.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# निलेश लंके यांच्यावर कौतुकाचा वर्षाव!

## आता आपण संसदेत मराठीत बोलू शकतो : शरद पवार

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या पक्षाच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित मेळाव्यात बोलताना बोलताना पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी अहमदनगरचे नवनिर्वाचित खासदार निलेश लंके यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. शरद पवार म्हणाले, निलेश लंके संसदेत मराठीत काय बोलतील याचा भरवसा नाही. मी त्यांना सांगितलं आहे की, "आपण संसदेत मराठीत बोलू शकतो. लंके यांनी लोकांसाठी कामं केली आहेत, म्हणूनच त्यांना मतदारसंघातील मतदारांनी मोठ्या बहुमताने विजयी केलं आहे. आता ते संसदेत जाऊन आपले प्रश्न मांडतील.**



तसेच मतदारसंघाचा विकास करतील. "शरद पवार म्हणाले, "आपले निलेश लंके मोठ्या बहुमताने निवडून आले आहेत आणि आता ते लोकसभेत जात आहेत. परंतु, मला एका गोष्टीची काळजी वाटते की निलेश लंके संसदेत जातील त्यावेळी त्यांच्याबरोबर आपले संसदेतील काही जुने सदस्य देखील असतील, आपल्या जुन्या सदस्यांना तिथले लोक विचारतील हा कोण गडी या ठिकाणी आणला? मात्र आपले हे खासदार संसदेतही जोरदार भाषण करतील यात शंका नाही. मी निलेश लंके यांना सांगितलं आहे की संसदेत मराठीतही भाषण करता येतं. निवडणुकीच्या काळात कुणीतरी म्हटलं इंग्रजीत का बोलत नाही? मला त्यांना सांगायचं आहे की इंग्रजी बोलायला काही अडचण नाही. परंतु, संसदेत हिंदीत किंवा आपली मातृभाषा मराठीतही बोलता येतं."राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्वेसर्वा म्हणाले, माईक एकदा का निलेश लंके यांच्या हातात आला की ते मराठीत काय बोलतील याचा भरवसा नाही. त्यांच्यात कुठल्याही गोष्टीची कमतरता नाही. त्यामुळेच जनतेने त्यांना बहुमताने निवडून दिलं आहे आणि आता ते संसदेत चांगलं काम करतील.अत्यंत किरकोळ शरीरयष्टी, डोळ्याला काड्यांचा चष्मा, खुरटलेली काळी-पांढरी दाढी, कपाळावर टिळा, साधा शर्ट आणि पॅन्ट असा पेहराव, अशा एकदम सामान्य वेशभूषेतील निलेश ज्ञानदेव लंके यांच्याकडे कार्यकर्त्यांच्या पोटात शिरण्याची आणि लोकांमध्ये मिसळण्याची विलक्षण हातोटी आहे. शिवाय तितक्याच कौशल्याने ते आधुनिक समाज माध्यमांचाही वापर करतात. या सामान्य कार्यकर्त्याने ग्रामपंचायतीचा सरपंच ते आमदार आणि आता खासदार अशी भरारी घेतली आहे. लंके यांनी यंदाच्या लोकसभा निवडणुकीत भाजपाचे खासदार सुजय विखे यांचा २८ हजार मतांनी पराभव केला आहे. लंके यांना ६.२४ लाख मतं मिळाली आहेत, तर सुजय विखे यांना ५.९६ लाख मतं मिळाली आहेत.तसेच मतदारसंघाचा विकास करतील. "शरद पवार म्हणाले, "आपले निलेश लंके मोठ्या बहुमताने निवडून आले आहेत आणि आता ते लोकसभेत जात आहेत. परंतु, मला एका गोष्टीची काळजी वाटते की निलेश लंके संसदेत जातील त्यावेळी त्यांच्याबरोबर आपले संसदेतील काही जुने सदस्य देखील असतील, आपल्या जुन्या सदस्यांना तिथले लोक विचारतील हा कोण गडी या ठिकाणी आणला? मात्र आपले हे खासदार संसदेतही जोरदार भाषण करतील यात शंका नाही. मी निलेश लंके यांना सांगितलं आहे की संसदेत मराठीतही भाषण करता येतं. निवडणुकीच्या काळात कुणीतरी म्हटलं इंग्रजीत का बोलत नाही? मला त्यांना सांगायचं आहे की इंग्रजी बोलायला काही अडचण नाही. परंतु, संसदेत हिंदीत किंवा आपली मातृभाषा मराठीतही बोलता येतं."राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्वेसर्वा म्हणाले, माईक एकदा का निलेश लंके यांच्या हातात आला की ते मराठीत काय बोलतील याचा भरवसा नाही. त्यांच्यात कुठल्याही गोष्टीची कमतरता नाही. त्यामुळेच जनतेने त्यांना बहुमताने निवडून दिलं आहे आणि आता ते संसदेत चांगलं काम करतील.अत्यंत किरकोळ शरीरयष्टी, डोळ्याला काड्यांचा चष्मा, खुरटलेली काळी-पांढरी दाढी, कपाळावर टिळा, साधा शर्ट आणि पॅन्ट असा पेहराव, अशा एकदम सामान्य वेशभूषेतील निलेश ज्ञानदेव लंके यांच्याकडे कार्यकर्त्यांच्या पोटात शिरण्याची आणि लोकांमध्ये मिसळण्याची विलक्षण हातोटी आहे. शिवाय तितक्याच कौशल्याने ते आधुनिक समाज माध्यमांचाही वापर करतात. या सामान्य कार्यकर्त्याने ग्रामपंचायतीचा सरपंच ते आमदार आणि आता खासदार अशी भरारी घेतली आहे. लंके यांनी यंदाच्या लोकसभा निवडणुकीत भाजपाचे खासदार सुजय विखे यांचा २८ हजार मतांनी पराभव केला आहे. लंके यांना ६.२४ लाख मतं मिळाली आहेत.

### संसदेत जाऊन आपले प्रश्न मांडतील

शरद पवार यांनी अहमदनगरचे नवनिर्वाचित खासदार निलेश लंके यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. शरद पवार म्हणाले, निलेश लंके संसदेत मराठीत काय बोलतील याचा भरवसा नाही. मी त्यांना सांगितलं आहे की,"आपण संसदेत मराठीत बोलू शकतो. लंके यांनी लोकांसाठी कामं केली आहेत, म्हणूनच त्यांना मतदारसंघातील मतदारांनी मोठ्या बहुमताने विजयी केलं आहे. आता ते संसदेत जाऊन आपले प्रश्न मांडतील.

# मंत्रिपदासाठी पटेलांचंच नाव द्यायचं आहे!

## अजित पवारः प्रफुल्ल पटेलांनी अनेक वर्षे केंद्रात कॅबिनेट मंत्री म्हणून काम पाहिलं

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची पिछेहाट झाली आहे. अजित पवारांचा पक्ष लोकसभेची केवळ एकच जागा जिंकू शकल्यामुळे त्यांच्या क्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत.**

लोकसभा निवडणुकीत अजित पवारांचा गट महायुतीत चार जागा लढला होता. मात्र त्यापैकी एकमेव रायगड लोकसभेची जागा जिंकण्यात त्यांना यश मिळालं आहे. सुनील तटकरे येथून निवडून आले आहेत. मात्र एनडीएने केंद्रीय मंत्रिमंडळात अजित पवारांच्या पक्षाला स्थान दिलेलं नाही. त्यामुळे या पक्षाबाबत वेगवेगळ्या चर्चा सुरू झाल्या आहेत. यावर अजित पवार यांनी भाष्य केलं.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित मेळाव्यात ते बोलत होते.



यावेळी अजित पवार यांनी सांगितलं की, एनडीएने आम्हाला राज्यमंत्रिपद देऊ केलेलं. मात्र आम्ही ते नाकारलं. अजित पवार म्हणाले, "मी भाजपाचे अध्यक्ष जे पी नड्डा, गृहमंत्री अमित शाह आणि संरक्षणंत्री राजनाथ सिंह यांच्याशी सातत्याने चर्चा करत आहे. एनडीएची पहिली बैठक झाली तेव्हा पंतप्रधान मोदी यांनी आम्हाला सांगितलं होतं की एनडीएबरोबर यावेळी अनेक पक्ष आहेत, त्यामुळे मी प्रत्येकाशी संपर्क साधू शकणार नाही. त्यामुळे तुम्ही नड्डा, शाह आणि राजनाथ सिंह यांच्या संपर्कात राहा, ते तुम्हाला वेळ देतील. त्याप्रमाणे आम्ही शाह, नड्डा आणि राजनाथ सिंह यांच्याशी चर्चा केली. त्यावेळी या तिघांनी आम्हाला सांगितलं की लोकसभातुमचा एकच खासदार निवडून आला आहे. तरी देखील आम्हाला तुम्हाला मंत्रिपद द्यायचं आहे. आम्ही तुम्हाला स्वतंत्र कार्यभार असलेलं राज्यमंत्रिपद देण्याचा विचार करत आहोत.

### वेगळा निर्णय घ्यायला हवा

आम्हाला मंत्रिपदासाठी प्रफुल्ल पटेल यांचं नाव द्यायचं आहे. पटेल यांनी याआधी अनेक वर्षे केंद्रात कॅबिनेट मंत्री म्हणून काम पाहिलं आहे. इतकी वर्षे कॅबिनेट मंत्री राहिलेल्या व्यक्तीने स्वतंत्र कार्यभार असलेलं राज्यमंत्रिपद सांभाळावं हे आमच्या मनाला काही पटत नाही, त्यामुळे तुम्ही यामध्ये वेगळा निर्णय घ्यायला हवा, असं मी त्यांना सांगितलं. त्यावर ते आम्हाला म्हणाले, तुमच्यासारखे इतरही पक्ष आपल्याबरोबर आहेत.

# पीएम योजनेतून 3 कोटी घरे बांधली जाणार!

## कोट्यवधी शेतकऱ्यांच्या खात्यात 20 हजार कोटी रुपये जमा होणार

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेत देशाचा कारभार हाती घेतला आहे. दरम्यान, शपथविधी सोहळ्यानंतर आज मोदी यांनी शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय घेतला. मोदी यांनी सकाळी पीएम किसान योजनेच्या १७ व्या हफ्त्याच्या फाईलवर स्वाक्षरी केली. त्यामुळे कोट्यवधी शेतकऱ्यांच्या खात्यात २० हजार कोटी रुपये जमा होणार आहेत. पाठोपाठ आता मोदी सरकार ३.० ची पहिली कॅबिनेट बैठक उत्साहात पार पडली.**



या पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीत मोदी यांनी सर्वसामान्यांची पक्क्या घराची इच्छा पूर्ण करण्यासाठी देशभर तीन कोटी अतिरिक्त घरे बांधण्यासाठी निधी देण्याचा निर्णय घेतला आहे. ही सर्व घरे पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून बांधली जाणार आहेत. संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार मोदी म्हणाले की "आमच्या नवीन सरकारचा पहिला निर्णय हा शेतकऱ्यांच्या कल्याणासाठीची आमची कटिबद्धता दर्शवतो. तर दुसऱ्या निर्णयाच्या माध्यमातून गरिबांचं घराचं स्वप्न पूर्ण केलं जाणार आहे.पंतप्रधानपदाची सूत्रं हाती घेतल्यानंतर नरेंद्र मोदी यांनी सोमवारी (१० जून) सायंकाळी पंतप्रधान कार्यालयातील अधिकाऱ्यांशी संवाद साधला. यावेळी मोदी म्हणाले, पंतप्रधान कार्यालय हे एक मोठं शक्ती केंद्र आहे. मी शक्ती केंद्र नाही तर हे कार्यालय शक्ती केंद्र आहे. मी सत्तेसाठी जन्माला आलेलो नाही. मी सत्ता काबीज करण्याचा विचार करत नाही. पंतप्रधान कार्यालय हे लोकांचं कार्यालय असलं पाहिजे, ते मोदींचं कार्यालय असता कामा नये. दरम्यान, केंद्रात एनडीएचं सरकार स्थापन केल्यानंतर मोदी सरकारने आधी शेतकऱ्यांसाठी आणि आता सर्वसामान्यांसाठी निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे देशातील तब्बल ९.३ कोटी शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. तर तीन कोटी घरांसाठी निधी जारी केल्यामुळे १२ ते १५ कोटी लोकांच्या डोक्यावर हक्काचं आणि पक्कं छत तयार होणार आहे.किसान योजनेच्या १७ व्या हप्त्यामध्ये सुमारे २० हजार कोटी रुपयांची मोठी रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात हस्तांतरित करण्यात आली आहे. त्यामुळे पीएम किसान योजनेच्या माध्यमातून २ हजार रुपयांचा हा हप्ता कोट्यवधी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार असल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, 'एनडीए सरकार हे शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी कटीबद्ध आहे. त्यामुळेच पंतप्रधानपदाचा कार्यभार स्वीकारताच मी पहिला निर्णय शेतकऱ्यांच्या कल्याणाशी संबंधित घेतला आहे. मी यापुढे शेतकरी आणि कृषी क्षेत्रासाठी आणखी काम करत राहणार आहे. या पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीत मोदी यांनी सर्वसामान्यांची पक्क्या घराची इच्छा पूर्ण करण्यासाठी देशभर तीन कोटी अतिरिक्त घरे बांधण्यासाठी निधी देण्याचा निर्णय घेतला आहे. ही सर्व घरे पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून बांधली जाणार आहेत. संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार मोदी म्हणाले की "आमच्या नवीन सरकारचा पहिला निर्णय हा शेतकऱ्यांच्या कल्याणासाठीची आमची कटिबद्धता दर्शवतो.

### केजरीवाल सध्या तिहार तुरुंगात

नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेत देशाचा कारभार हाती घेतला आहे. दरम्यान, शपथविधी सोहळ्यानंतर आज मोदी यांनी शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय घेतला. मोदी यांनी सकाळी पीएम किसान योजनेच्या १७ व्या हफ्त्याच्या फाईलवर स्वाक्षरी केली. त्यामुळे कोट्यवधी शेतकऱ्यांच्या खात्यात २० हजार कोटी रुपये जमा होणार आहेत. पाठोपाठ आता मोदी सरकार ३.० ची पहिली कॅबिनेट बैठक चालू आहे. तर दुसऱ्या निर्णयाच्या माध्यमातून गरिबांचं घराचं स्वप्न पूर्ण केलं जाणार आहे.पंतप्रधानपदाची सूत्रं हाती घेतल्यानंतर नरेंद्र मोदी यांनी सोमवारी (१० जून) सायंकाळी पंतप्रधान कार्यालयातील अधिकाऱ्यांशी संवाद साधला. यावेळी मोदी म्हणाले, पंतप्रधान कार्यालय हे एक मोठं शक्ती केंद्र आहे. मी शक्ती केंद्र नाही तर हे कार्यालय शक्ती केंद्र आहे. मी सत्तेसाठी जन्माला आलेलो नाही. मी सत्ता काबीज करण्याचा विचार करत नाही. पंतप्रधान कार्यालय हे लोकांचं कार्यालय असलं पाहिजे, ते मोदींचं कार्यालय असता कामा नये.दरम्यान, केंद्रात एनडीएचं सरकार स्थापन केल्यानंतर मोदी सरकारने आधी शेतकऱ्यांसाठी आणि आता सर्वसामान्यांसाठी निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे देशातील तब्बल ९.३ कोटी शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. तर तीन कोटी घरांसाठी निधी जारी केल्यामुळे १२ ते १५ कोटी लोकांच्या डोक्यावर हक्काचं आणि पक्कं छत तयार होणार आहे.किसान योजनेच्या १७ व्या हप्त्यामध्ये सुमारे २० हजार कोटी रुपयांची मोठी रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात हस्तांतरित करण्यात आली आहे. त्यामुळे पीएम किसान योजनेच्या माध्यमातून २ हजार रुपयांचा हा हप्ता कोट्यवधी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार असल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, 'एनडीए सरकार हे शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी कटीबद्ध आहे.

# मध्यप्रदेशच्या 'मामां'ना खास मंत्रिपदाचं गिफ्ट

## खासदार शिवराज सिंह चौहान यांना देण्यात आलं कृषीमंत्रिपद

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतर आज नरेंद्र मोदी यांच्या मंत्रीमंडळाची पहिली बैठक पार पडली. या बैठकीत खातेवाटप जाहीर करण्यात आलं आहे. त्यानुसार मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री तथा नवनिर्वाचित खासदार शिवराज सिंह चौहान यांना कृषीमंत्रिपद देण्यात आलं आहे. त्यामुळे देशाचे कृषीमंत्री अशी शिवराज सिंह चौहान यांनी नवी ओळख निर्माण झाली आहे.**

शिवराज सिंह चौहान मध्य प्रदेशातील विदिशा मतदारसंघातून तब्बल ८ लाखांहून अधिक मतांनी विजयी झाले आहेत. त्यापूर्वी ते मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री होते. लोकसभा निवडणुकीपूर्वी भाजपाने त्यांचं मुख्यमंत्रिपद काढून घेत त्यांना मध्य प्रदेशातील विदिशा मतदारसंघातून लोकसभेची उमेदवारी दिली होती. या निवडणुकीत त्यांनी तब्बल ८ लाख १७ हजार मतांन विजय मिळवला.

दरम्यान, शिवराज सिंह यांच्या व्यक्तीरिक्त मोदींच्या तिसऱ्या मंत्रिमंडळात अमित शाह यांना गृह विभाग, राजनाथ सिंह यांना संरक्षण, निर्मला सीतारामण यांना अर्थ, एस. जयशंकर यांना परराष्ट्र आणि नितीन गडकरी यांना रस्ते वाहतूक तथा महामार्ग मंत्रालयाची जबाबदारी देण्यात आली आहे.



याशिवाय भाजपा अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्याकडे आरोग्य मंत्रालय सोपवण्यात आलं आहे. याशिवाय राज्यमंत्र्यांनाही खातेवाटप जाहीर झालं आहे.

त्यानुसार, जितिन प्रसाद यांना वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय, श्रीपाद येसो नाईक यांना ऊर्जा मंत्रालय, पंकज चौधरी यांना अर्थ मंत्रालय, कृष्ण पाल यांना सहकार मंत्रालय, रामदास आठवले यांना सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय, राम नाथ ठाकूर यांना कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय, नित्यानंद राय यांना गृह मंत्रालय, तर अनुप्रिया पटेल यांना आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाचे राज्यमंत्रीपद देण्यात आलं आहे.शिवराज सिंह चौहान मध्य प्रदेशातील विदिशा मतदारसंघातून तब्बल ८ लाखांहून अधिक मतांनी विजयी झाले आहेत. त्यापूर्वी ते मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री होते.

लोकसभा निवडणुकीपूर्वी भाजपाने त्यांचं मुख्यमंत्रिपद काढून घेत त्यांना मध्य प्रदेशातील विदिशा मतदारसंघातून लोकसभेची उमेदवारी दिली होती. या निवडणुकीत त्यांनी तब्बल ८ लाख १७ हजार मतांन विजय मिळवला.

### अमित शाह यांना गृहमंत्रिपद

दरम्यान, शिवराज सिंह यांच्या व्यक्तीरिक्त मोदींच्या तिसऱ्या मंत्रिमंडळात अमित शाह यांना गृह विभाग, राजनाथ सिंह यांना संरक्षण, निर्मला सीतारामण यांना अर्थ, एस. जयशंकर यांना परराष्ट्र आणि नितीन गडकरी यांना रस्ते वाहतूक तथा महामार्ग मंत्रालयाची जबाबदारी देण्यात आली आहे. याशिवाय भाजपा अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्याकडे आरोग्य मंत्रालय सोपवण्यात आलं आहे, सक्षमीकरण मंत्रालय, राम नाथ ठाकूर यांना कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय, नित्यानंद राय यांना गृह मंत्रालय, तर अनुप्रिया पटेल यांना आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाचे राज्यमंत्रीपद देण्यात आलं आहे.

# 'मुंज्या' चित्रपटाची बॉक्स ऑफिसवर जोरदार कमाई

सुपरहिट 'स्त्री' चित्रपट निर्मात्यांनी पुन्हा एकदा प्रेक्षकांसाठी हॉरर-कॉमेडी चित्रपट आणला आहे. अभिनेत्री शर्वरी वाघ, अभय वर्मा, मोना सिंह आणि सत्यराज अभिनीत 'मुंज्या' चित्रपट ७ प्रदर्शित झाला आहे. आदित्य सरपोतदार दिग्दर्शित 'मुंज्या' चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळताना दिसत आहे. चित्रपटाची कथा आणि वीएफएक्सने प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. त्यामुळे बॉक्स ऑफिसवर चित्रपटाची जोरदार कमाई सुरू आहे.'मुंज्या' चित्रपटाचं कौतुक प्रेक्षकांसह समीक्षकांनी केलं असून एमआयडीबीवर चित्रपटाला १० पैकी ७.२ रेटिंग देण्यात आलं आहे. एकाबाजूला सर्वकाही सुरळीत चालताना दिसत असलं तरी दुसऱ्याबाजूला चित्रपटाला स्क्रीन्स कमी मिळत आहे. पण ज्या प्रकारे चित्रपट दिवसेंदिवस आधिकाधिक कमाई करत आहे, तर स्क्रीन्सचेही प्रमाण वाढले अशी शक्यता वर्तवली गेली आहे. 'मुंज्या' चित्रपटाने आतापर्यंत किती कमाई केली? जाणून घ्या... सध्या बॉक्स ऑफिसवर 'मुंज्या' चित्रपटाला टक्कर देण्यासारखा कुठलाही चित्रपट नाहीये. याचाच फायदा 'मुंज्या'ला झाला आहे. प्रदर्शनानंतरच्या पहिल्याच दिवशी चित्रपटाने ४ कोटी २१ लाख रुपयांचा व्यवसाय केला आहे. समीक्षकांनी अंदाज लावला होता की, 'मुंज्या' चित्रपट पहिल्या दिवशी १.५ ते २ कोटींचा गल्ला जमवेल. पण याच्या दुप्पट कमाई चित्रपटाने केली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी चित्रपटाच्या व्यवसायात आणखी मोठी वाढ झाली आहे.

# कोणीच पाठिंबा न दिल्याने कंगना भडकली

लोकसभा निवडणुकीत हिमाचल प्रदेशमधील मंडी मतदारसंघातून विजयी झालेल्या नवनिर्वाचित खासदार व अभिनेत्री कंगना रणौत यांना चंदीगढ विमानतळावर एका महिला सुरक्षारक्षकाना थोबाडीत लगावली. मारहाण सीआयएसएफ महिला सुरक्षारक्षक कुलविंदर कौरला निलंबित करण्यात आलं आहे. मारहाण झाल्याप्रकरणी सिनेइंडस्ट्रीतील कोणीही प्रतिक्रिया दिलेली नाही, यावर कंगना यांनी नाराजी व्यक्त करत सेलिब्रिटींनी सुनावलं आहे. कंगना रणौत यांच्यावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी बॉलीवूडमधील सेलिब्रिटींनी कोणतीच प्रतिक्रिया दिलेली नाही. काही दिवसांपूर्वी 'ऑल आईज ऑन राफाह' ही पोस्ट अनेकांनी शेअर केली होती. त्या पोस्टचा उल्लेख करत कंगना यांनी सेलिब्रिटींवर टीका केली आहे. त्यांनी इन्स्टाग्रामवर केलेली पहिली पोस्ट डिलीट केली आणि नंतर दुसरी पोस्ट केली. त्यांच्या या दोन्ही पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.कंगना यांनी पहिल्या पोस्टमध्ये लिहिलं होतं, पूर्ण मौन बाळगून आहात. पण लक्षात ठेवा, उद्या तुम्ही आपल्या देशात किंवा जगात कुठेही रस्त्यावर फिरत असाल, तेव्हा काही इस्रायली/पॅलेस्टिनी तुमच्यावर किंवा तुमच्या मुलावर हल्ला करतील, तेही फक्त याचसाठी की तुम्ही सर्वजण राफाहच्या समर्थनार्थ उभे होता होतात, त्यावेळी तुम्ही पाहाल की मी तुमच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी लढेन... जर एखाद्या दिवशी तुम्हाला वाटेल मी का आणि मी कुठे आहे, तर लक्षात ठेवा तुम्ही मी नाहीत.

# शरयू आणि पूर्वा पुन्हा एकदा थिरकल्या

'पारू' या मालिकेने अगदी थोड्या वेळातंच प्रेक्षकांचं मन जिंकलं. पारूची भूमिका साकारणारी शरयू सोनावणे प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलीय. शरयू सोशल मीडियावर कायम सक्रिय असते. चाहत्यांबरोबर संपर्कात राहण्यासाठी शरयू मालिकेच्या सेटवरील धमाल मस्ती सोशल मीडियाद्वारे शेअर करत असते.या मालिकेत दिशा हे खलनायिकेचं पात्र साकारणारी पूर्वा शिंदेबरोबर शरयू अनेकदा डान्स रील्स बनवत असते. अलीकडेच "ए कंचन" या ट्रेंडिंग गाण्यावर दोघी थिरकल्या होत्या. तर दोघींनी प्रसादबरोबर 'पुष्पा-२'च्या "अंगारो सा" या गाण्यावरदेखील हूकस्टेप करत डान्स केला होता. तो अजूनही सोशल मीडियावर व्हायरल होतोय. पुष्पा चित्रपटातील 'अंगारो' हे गाण नुकतंच प्रदर्शित झालं. या गाण्याच्या हूकस्टेपने सध्या प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेतलंय. गाण रीलिज झाल्यानंतर अनेक कलाकारांनी ही हूकस्टेप करत सोशल मीडियावर रिल्स शेअर करायला सुरुवात केलीय.अशातच दोघी पुन्हा एकदा याच गाण्यावर थिरकल्या आहेत. या डान्सचा व्हिडीओ पूर्वाने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर शेअर केला आहे. हे गाणं रीलिज झाल्यापासून ट्रेंडिंग आहे. सोशल मीडिया इंफ्लूएन्सर्स ते कलाकार या गाण्यावर थिरकताना दिसतायत. दोघींचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होताना दिसतोय. अगदी काही वेळातच या व्हिडीओला तीन हजारांपेक्षा जास्त व्यूज मिळाले आहेत. दोघींच्या मनमोहक अदांनी चाहत्यांना भुरळ पाडली आहे. शरयू आणि पूर्वाचा हा डान्स व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होतोय.



# वय न लपवण्याबद्दल समीरा म्हणाली

बॉलीवूड अभिनेत्री समीरा रेड्डी हिने सिनेइंडस्ट्रीतील तिचे अनुभव सांगितले आहेत. करिअरमध्ये यशाच्या शिखरावर असताना तिच्या शरीरात बदल करण्यासाठी इंडस्ट्रीकडून आलेल्या दबावाबद्दल तिने भाष्य केलं. तिला अनेक प्रसंगी अनेक फिल्टर्स लावण्यास सांगितलं गेलं, पण या दबावाला न जुमानता आपण काम केलं असं समीराने नमूद केलं. 'हिंदुस्तान टाईम्स'ला दिलेल्या मुलाखतीत समीरा म्हणाली, "माझ्या करिअरमध्ये यशाच्या शिखरावर असताना मी सर्जरी करून माझे स्तन मोठे करून घ्यावे, यासाठी माझ्यावर किती दबाव टाकला गेला हे मी सांगू शकत नाही. बरेच लोक म्हणायचे,'समीरा, सगळे करत आहेत, मग तू का नाही?' पण मला माझ्या आत असं काही नको होतं. हे आपले असे दोष लपवण्यासारखं झालं जे मुळात दोष नाहीच. ज्यांना प्लास्टिक सर्जरी आणि बोटॉक्स करायचं आहे त्यांना मी नावं ठेवणार नाही, पण मी ते करणार नाही."समीरा बऱ्याचदा आपलं वय जाहीरपणे सांगते आणि यासाठी चाहते तिचं कौतुकही करतात. गुगलने समीराचं वय चुकीचं दिलं होतं, पण तिने ते दुरुस्त करून घेतल्याचं सांगितलं. "लोक म्हणतात की मी आता अधिक आनंदी आणि अधिक कंफर्टेबल दिसत आहे. मी २८ वर्षांची असताना सुंदर दिसत होते, पण ४५ व्या वर्षी एक कंफर्ट आला आहे. मी ४० वर्षांची असताना इंटरनेट माझं वय ३८ वर्षे दाखवत होतं. पण मला ४० वर्षांची असल्याचा अभिमान होता म्हणून मी लगेचच ते बदलून घेतलं," असं समीरा म्हणाली. सुरुवातीला समीरा जेव्हा सोशल मीडियावर आली, तेव्हा तिला अनेकांनी फिल्टर वापरण्याचा सल्ला दिला होता. "मी म्हणाले की मी माझी त्वचा खराब असेल तर मी ती तशीच दाखवेन, मी माझं वाढलेलं वजन दाखवेन. कारण हीच मी आहे. ३६-२४-३६ या बॉडी साइजमध्ये फिट होण्याचा प्रयत्न करण्याऐवजी मी जे केलं, त्याबद्दल जास्त आनंदी आहे. मी खऱ्या आयुष्यात जशी आहे, तशीच मी सोशल मीडियावर वावरले. चित्रपटांमध्ये काम करताना मी हे कधीच करू शकले नव्हते."समीरा पुढे म्हणाली, "माझ्या आणि माझ्या प्रेक्षकांमध्ये नेहमीच एक पडदा होता. लोकांना जे ऐकायचं आहे तेच फक्त आम्ही मांडतो, परंतु तुम्ही झोपेतून उठता तेव्हा सुंदर आणि खूपच नीट दिसता हे दाखवल्याने आपण असे का दिसत नाही हा विचार करून इतरांना टेन्शन येऊ शकतं. समीरा पुढे म्हणाली, "माझ्या आणि माझ्या प्रेक्षकांमध्ये नेहमीच एक पडदा होता. लोकांना जे ऐकायचं आहे तेच फक्त आम्ही मांडतो, परंतु तुम्ही झोपेतून उठता तेव्हा सुंदर आणि खूपच नीट दिसता हे दाखवल्याने आपण असे का दिसत नाही हा विचार करून इतरांना टेन्शन येऊ शकतं. खरं तर तो फक्त दिखावा असतो. मी दररोज उठते तेव्हा फार चांगली दिसत असते असं नाही, मीही सकाळी उठल्यावर माझ्या मुलांच्या मागे धावत असते. ४५ वर्षांची झाल्यावरही माझ्याकडे चांगलं दिसण्याची क्षमता आहे. तुमचे पांढरे केस, तुमची पोटाची चरबी आणि तुमचे स्ट्रेच मार्क्स दाखवता तेव्हा तिथल्या कोणाला तरी 'माझ्यासारखंही दुसरं कोणीतरी आहे' असं वाटतं आणि यामुळे त्यांच्यावरील दबाव दूर होतो."



# ट्विंकलने अनेक पुस्तकं लिहिली

एकेकाळची लोकप्रिय अभिनेत्री व प्रसिद्ध लेखिका ट्विंकल खन्ना हिने आता तिच्या आयुष्यातील एक मनोरंजक किस्सा सांगितला आहे. हा किस्सा तिची मुलगी निताराशी संबंधित आहे. मुलगी निताराच्या रंगावर एका नातेवाईकाने टिप्पणी केली होती, असं ट्विंकलने तिच्या ब्लॉगमध्ये सांगितलं आहे. नातेवाईकाच्या त्या टिप्पणीनंतर निताराला पोहणं शिकायचं नव्हतं आणि अचानक तिला भाऊ आरवसारखं गोरं दिसायचं होतं, असं ट्विंकल म्हणाली. 'द टाइम्स ऑफ इंडिया'मध्ये लिहिलेल्या ब्लॉगमध्ये ट्विंकल म्हणाली, "एक वेळ अशी होती जेव्हा माझ्या लहान मुलीला पोहणं शिकणं थांबवायचं होतं. कारण तिची त्वचा काळवंडली होती. 'मला दादासारखाच रंग हवा आहे.' असं ती म्हणत होती. त्यामागचं कारण म्हणजे एका मूर्ख नातेवाईकाने केलेली टिप्पणी तिने ऐकली होती. 'ती खूप गोंडस आहे पण तिच्या भावासारखी गोरी नाही,' असं त्या नातेवाईकाने म्हटलं होतं."या प्रसंगानंतर आपण मुलीला फ्रिडा काहलोचं यांचं आत्मचरित्र वाचायला दिलं, असं ट्विंकलने सांगितलं. फ्रिडा या खूप गोऱ्या नव्हत्या, त्यांच्या दोन्ही भुवया आपसात जोडलेल्या होत्या, पण त्या प्रचंड हुशार होत्या. या पुस्तकामुळे चिमुकल्या निताराचे दिसण्याविषयीचे, रंगाविषयीचे तिचे विचार बदलले. आता ती म्हणते की तिला भावाइतकं सनब्लॉकर वापरावं लागत नाही, कारण तो गोरा आहे, त्यामुळे त्याला त्याच्या त्वचेची जास्त काळजी घ्यावी लागते. पांढरा रंग लवकर घाण होतो, पण तपकिरी व गडद रंग लवकर घाण होत नाहीत, असं नितारा म्हणते. ट्विंकलने सांगितलं की तिला वाचनाची सवय तिचे वडील राजेश खन्ना यांनी लावली होती. तेही खूप पुस्तकं वाचायचे. माझ्या मुलीला पुस्तकं वाचायला शिकवणं सोपं नव्हतं.

# दक्षिण आफ्रिकेने उलटवली बाजी!

## » विजयाच्या उंबरठ्यावर बांगलादेशचा अपेक्षाभंग

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**६ चेंडू ११ धावा. टी२० क्रिकेटमध्ये सहजी वाटणारं समीकरण. समोर फिरकीपटू. तीन फुलटॉस. अशा अनुकूल गोष्टी होऊनही बांगलादेशला टी२० वर्ल्डकपमध्ये विजयश्री खेचून आणता आली नाही. दक्षिण आफ्रिकेने अवघ्या ४ धावांनी विजय मिळवत सुस्कारा टाकला. न्यूयॉर्कच्या आव्हानात्मक खेळपट्टीवर दक्षिण आफ्रिकेला ११३ धावाच करता आल्या. बांगलादेशचा संघ विजयपथावर होता. मात्र हाणामारीच्या षटकात चौकार आणि षटकार मारण्याची हातोटी नसल्याने बांगलादेशला समीप येऊनही विजय गवसला नाही.**




काही दिवसांपूर्वीच अमेरिकेने पाकिस्तानला नमवलं होतं तर अफगाणिस्तानने न्यूझीलंडला हरवलं होतं. या यादीत आता आफ्रिकेची भर पडण्याची शक्यता होती. टी२० वर्ल्डकपच्या इतिहासात आफ्रिका आणि बांगलादेश यांच्यात तीन लढती झाल्या होत्या. तिन्हीमध्ये दक्षिण आफ्रिकेनेच बाजी मारली होती. तो इतिहास कायम राहिला. रविवारी याच खेळपट्टीवर भारत आणि पाकिस्तान सामना झाला होता. भारतीय संघाने ११९ धावांचा यशस्वी बचाव केला होता. गोलंदाजांना पोषक अशा खेळपट्टीवर प्रथम फलंदाजी करणं अतिशय कठीण मानलं जात आहे. स्पर्धेत या मैदानावर झालेल्या लढतींचा इतिहास माहिती असूनही दक्षिण आफ्रिकेने फलंदाजी स्वीकारली. पहिल्याच षटकात तान्झिम सकीबने रीझा हेन्ड्रिक्सला माघारी धाडलं. तो भोपळाही फोडू शकला नाही. तिसऱ्या षटकात तान्झिमनेच क्विंटनला त्रिफळाचीत केलं. पुढच्या षटकात तास्किन अहमदने आफ्रिकेचा कर्णधार एडन मारक्रमला तंबूचा रस्ता दाखवला. पाठोपाठ युवा ट्रिस्टन स्टब्सही भोपळाही न फोडता पॅव्हेलियनमध्ये परतला. दक्षिण आफ्रिकेची स्थिती २३/४ अशी झाली. यानंतर डेव्हिड मिलर आणि हेनरिच क्लासन यांनी पाचव्या विकेटसाठी ७९ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. या दोघांनी एकेरी-दुहेरी धावांचा रतीब घालतानाच चौकार-षटकारही लगावले. या भागीदारीमुळेच आफ्रिकेला सन्मानजनक धावसंख्या गाठता आली. तास्किनने क्लासनला बाद करत ही जोडी फोडली. त्याने ४६ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. पुढच्याच षटकात डेव्हिड मिलर रिषाद हुसेनच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्याने २९ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेला ११३ धावांचीच मजल मारता आली. बांगलादेशकडून तान्झिमने ३ तर तास्किनने २ विकेट्स पटकावल्या. या छोटेखानी लक्ष्याचा पाठलाग करताना तांझिड हसनने दोन चौकारांसह आक्रमक सुरुवात केली पण कागिसो रबाडाने त्याला बाद केलं. कर्णधार शंटो आणि लिट्टन दास डाव सावरला. केशव महाराजने लिट्टनला मिलरकडे झेल देण्यास भाग पाडलं. प्रचंड अनुभवी शकीब अल हसनकडून बांगलादेशला मोठ्या अपेक्षा होत्या. पण अवघ्या ३ धावा करुन शकीब माघारी परतला. अँनरिक नॉर्कियाने त्याला बाद केलं. नॉर्कियानेच शंटोलाही बाद केलं. यानंतर महमदुल्ला आणि तौहिद हृदॉय यांनी पाचव्या विकेटसाठी ४४ धावांची भागीदारी केली. तौहिदला रबाडाने पायचीत केलं. त्याने ३७ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. महमदुल्ला हा बांगलादेशचा आशास्थान होता. जेकर अली ८ धावा करुन तंबूत परतला. अंतिम षटकात बांगलादेशला ११ धावांची आवश्यकता होती. पहिला चेंडू वाईड ठरला. पुढच्या चेंडूवर महमदुल्लाने एक धाव काढली. जेकर अलीला बाद करत महाराजने आफ्रिकेला पुनरागमनाची संधी दिली.

### आफ्रिकेचा अवघ्या 4 धावांनी विजय

चौथ्या चेंडूवर लेगबायची एक धाव मिळाली. पाचव्या चेंडूवर फुलटॉसवर महमदुल्लाने जोरदार फटका लगावला पण एडन मारक्रमने सीमीरेषजवळ काटेकोरपणे झेल टिपत संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं. अंतिम चेंडूवर बांगलादेशला ६ धावांची आवश्यकता होती पण तास्किन केवळ एकच धाव मिळवू शकला. दक्षिण आफ्रिकेकडून महाराजने ३ तर रबाडा आणि नॉर्किया यांनी प्रत्येकी २ विकेट्स पटकावल्या.६ चेंडू ११ धावा. टी२० क्रिकेटमध्ये सहजी वाटणारं समीकरण. समोर फिरकीपटू. तीन फुलटॉस. अशा अनुकूल गोष्टी होऊनही बांगलादेशला टी२० वर्ल्डकपमध्ये विजयश्री खेचून आणता आली नाही. दक्षिण आफ्रिकेने अवघ्या ४ धावांनी विजय मिळवत सुस्कारा टाकला.

---

# दुबळ्या स्कॉटलंडचा बलाढ्य इंग्लंडला दणका

## » वर्ल्डकपमध्ये आणखी एका मोठ्या संघावर नामुष्की

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**टी-२० विश्वचषक २०२४ मधील रोमांच दिवसागणिक वाढत जात आहे. स्पर्धेचा पुढचा टप्पा म्हणजेच सुपर-8 गाठण्याचे समीकरण दिवसेंदिवस अटीतटीचं होतं चाललं आहे. या स्पर्धेतील छोटे संघ आपल्या कामगिरीने क्रिकेटप्रेमींची मने जिंकत आहेत. त्याचबरोबर माजी चॅम्पियन संघांना स्पर्धेतून बाहेर जाण्याचा धोका आहे. टी-२० विश्वचषकात रविवारी होणाऱ्या भारत आणि पाकिस्तान सामन्यावर संपूर्ण जगाचे लक्ष लागले होते. पण अँटिग्वाच्या नॉर्थ साऊंडमध्ये आणखी एक सामना खेळवला जात होता.**







ओमानचा सामना स्कॉटलंडशी होता. स्कॉटलंडने हा सामना जिंकला. या पराभवासह ओमान स्पर्धेतून बाहेर पडणारा पहिला देश ठरला आहे.प्रथम फलंदाजी करताना ओमानने ७ गड्यांच्या मोबदल्यात १५० धावा केल्या. स्कॉटलंडने हा सामना ७ गडी राखून सहज जिंकला. स्कॉटलंडचा तीन सामन्यांमधला हा दुसरा विजय आहे. ओमान-स्कॉटलंडमधील सामन्यानंतर सर्वात मोठा तणाव गतविजेत्या इंग्लंडसमोर आहे. स्कॉटलंडच्या गटात ओमान, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड आणि नामिबिया हे संघ आहेत. स्कॉटलंड संघाचा इंग्लंडविरुद्धचा सामना पावसामुळे अनिर्णित राहिला होता. तर ओमानविरुद्धचा सामना स्कॉटलंडने १४व्या षटकात जिंकला म्हणजे स्कॉटलंडचा नेट रन रेट आता +२.१६४ झाला. त्यांचेही ३ सामन्यात ५ गुण आहेत. इंग्लंडचे दोन सामन्यांत एक गुण आहे आणि नेट रन रेट -१.८०० आहे.म्हणजेच ब गटात आता स्कॉटलंडचा संघ ५ गुणांसह पहिल्या स्थानी आहे आणि ऑस्ट्रेलियाचा संघ ४ गुणांसह दुसऱ्या स्थानी आहे. नामिबिया २ गुणांसह तिसऱ्या स्थानी आहे. तर इंग्लंड १ गुणासह चौथ्या स्थानी आहे. इंग्लंडचे अजूनही नामिबिया आणि ओमानविरूद्ध सामने बाकी आहेत. इंग्लंडला त्यांचे दोन्ही सामने मोठ्या फरकाने जिंकावे लागतील. तरच त्यांना सुपर८ मध्ये जाण्याची संधी मिळू शकते तर स्कॉटलंडचा पुढील सामना ऑस्ट्रेलियाशी होणार आहे. स्कॉटलंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील सामना पावसामुळे रद्द झाला तरीही इंग्लंडचा स्पर्धेतील प्रवास संपुष्टात येईल.

### दोन्ही सामने जिंकावे लागतील

जोस बटलरच्या नेतृत्वाखालील इंग्लंडला स्पर्धेतून बाहेर पडण्याचा धोका आहे. इंग्लंडचे अजून २ सामने बाकी आहेत. हा सामना ओमान आणि नामिबियाविरुद्ध होणार आहे. इंग्लंडसाठी अडचण अशी आहे की, त्यांना हे दोन्ही सामने जिंकावे लागतीलच शिवाय त्यांचा नेट रन रेटही सुधारावा लागेल. इंग्लंडचा नेट रन रेट सध्या -१.८ आहे. या गटातील अव्वल २ संघ सुपर८ मध्ये प्रवेश करतील. ऑस्ट्रेलियाने आपले दोन्ही सामने जिंकले असून त्यांचे पुढील दोन सामने नामिबिया आणि स्कॉटलंडविरुद्ध होणार आहेत. ऑस्ट्रेलियाने एकही सामना जिंकला तर ते सुपर८ मध्ये प्रवेश जातील. सुपर८ मध्ये पोहोचण्यासाठी स्कॉटलंड, नामिबिया आणि इंग्लंड यांच्यात चुरशीची लढत आहे. तर इंग्लंडला सुपर८ मध्ये पोहोचण्यासाठी ओमान आणि नामिबियाविरुद्धचे दोन्ही सामने जिंकावे लागतील.